MHKO100009582022

**नियमीत दरखास्त क्र. २२/२०२२**

रमाकांत बांदेकर.
//वि//
संजय शिंदे.

**निशाणी क्र. १० वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांनी त्यांचेविरुध्द झालेला "म्हणणे नाही" चा आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दरखास्तदारतर्फे सदर अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. दरखास्तदार यांनी सदरची दरखास्त ही तडजोडीप्रमाणे हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दाखल केलेली आहे. वि.प. यांना नोटीसीची बजावणी झालेली आहे, परंतु त्यांनी मुदतीत म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे, त्यांचेविरुध्द अर्ज विना म्हणणे चालविणेबाबत आदेश दिनांक ०७/०१/२०२३ रोजी पारीत करणेत आला. वि.प. यांनी सदरचा अर्ज दिनांक ०४/०३/२०२३ रोजी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणात वि.प. यांनी असे कारण नमुद केलेले आहे की, वि.प. हे वयोवृध्द असून ते वरचेवर आजारी असतात व दरम्यानचे काळात ते आजारी होते आणि डॉक्टरांनी त्यांना विश्रांतीचा सल्ला दिलेला होता. तसेच, त्यांचे घरी धार्मीक कार्यक्रमही होता. त्यामुळे, वि.प. यांना मुदतीत वकीलांची भेट घेऊन म्हणणे दाखल करणेबाबत माहिती देता आली नाही, त्यामुळे म्हणणे देणेस विलंब झालेला आहे. प्रत्यक्षात सदर कारण व वि.प. हजर झाल्याचा काळ विचारात घेतले असता, सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी वि.प. यांना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, वि.प. यांना त्यांचे म्हणणे सादर करु देणे मला योग्य वाटते. वर नमुदप्रमाणे वि.प. यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला असल्याने प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.
०२. खर्चाची रक्कम वि.प.क्र.३ यांनी पुढील तारखेपर्यंत दरखास्तदार यांना अदा करावी.
०३. खर्चाची रक्कम दरखास्तदार यांना दिल्यानंतर वि.प.क्र.३ यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2024.06.28 17:33:35 +0530

गडहिंग्लज.
दिनांकः २८/०६/२०२४.

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 28/06/2024 |
| Order signed by P.O. on | 28/06/2024 |
| Order uploaded on | 29/06/2024 |